# बी. ए. प्रथम वर्ष

## पेपर –02

## महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

## Unit 1st

# महाराष्ट्राची अर्थिक व लोकसंख्या विषयक वैशिष्टये

प्रा. डॉ. स्वाती कुरमे
अर्थशास्त्र विभाग
बळीराम पाटील महाविद्यालय किनवट

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था

- महाराष्ट्र राज्याची स्थापना 1 मे 1960
- राजधानी मुंबई, राज्यभाषा मराठी.
- एकुण जिल्हे 36, एकुण तालुके 355, ग्रामपंचायत 28,813, पंचायत समित्या 355.
- एकुण जिल्हापरिषद 34.
- विधानसभा आमदार 288 , विधानपरिषद आमदार 78, महा. लोकसभा सदस्य 48.
- लोकसंख्येच्या बाबतीत 2 रा क्रमांक, क्षेत्रफळात 3 रा क्रमांक.
- देशातील 9.29: लोकसंख्या महाराष्ट्रात राहाते.
- महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकसंख्या 'पुणे' ( 94.3 लाख)
- महाराष्ट्रातील सर्वाधिक कमी लोकसंख्या 'सिंधुदुर्ग' (8.50 लाख)
- महाराष्ट्रातील सर्वाधिक जंगले असलेला जिल्हा गडचिरोली.
- महाराष्ट्रातील कमी जंगल असलेला जिल्हा बीड.
- महाराष्ट्रातील अधिक तलावांचा जिल्हा गोंदिया.
- महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वात मोठा जिल्हा अहमदनगर.
- महाराष्ट्रातील क्षेत्रफळाने सर्वात लहान जिल्हा मुंबई शहर.
- महाराष्ट्रातील उंच शिखर कळसुबाई 1646 मी.
- महाराष्ट्रातील सर्वात लांब नदी गोदावरी.
- महाराष्ट्रात सर्वात जास्त समुद्रकिनारा रत्नागिरी.
- जगातील पहिले जैव तंत्रज्ञान विद्यापीठ नागपुर.
- पहिला संपुर्ण डिजीटल जिल्हा नागपुर (ऑक्टोबर 2016)

*महाराष्ट्राची संपूर्ण माहिती*

महाराष्ट्र हे भारतातील पश्चिम भागातले एक राज्य आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्र भारतातील तिसरे व लोकसंख्येच्या बाबतीत दुसरे मोठे राज्य आहे. महाराष्ट्र हे भारतातील सर्वांत विकसनशिल राज्यांपैकी एक आहे. महाराष्ट्र राज्याची सीमा गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, तेलंगणा, कर्नाटक, गोवा आणि दादरा आणि नगर-हवेली या केंद्रशासित प्रदेशांशी जोडलेली आहे. राज्याच्या पश्चिमेला अरबी समुद्राची किनारपट्टी आहे. जवळपास 11 कोटी लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्राची राजधानी मुंबई आहे. *(जनगणना 2011)*

मुंबईत साधारण 1.8 कोटी लोक राहतात. नागपूर शहर महाराष्ट्राची उपराजधानी आहे. मध्ययुगीन महाराष्ट्र सातवाहन राजवंश राष्ट्रकूट राजवंश, पश्चिम चालुक्य, मुघल आणि मराठ्यांच्या साम्राज्याचा समावेश आहे. विस्तार 1, 18, 809 चौरस मैल (3,07, 710 चौरस किमी) असून, तो पश्चिम आणि कर्नाटक, तेलंगणा, गोवा, गुजरात, छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि दादरा आणि नगर हवेली भारतीय राज्यांना अरबी समुद्र लागून आहे. महाराष्ट्र हा फुले-शाहू-आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो. कारण महाराष्ट्राला या तीन समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभलेला आहे.

## महाराष्ट्रातील 6 प्रशासकीय विभाग:

- **कोकण** (30746 **चौ.किमी**): मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी/सिंधुदुर्ग.
- **पुणे/प.महाराष्ट्र** (57268 **चौ.किमी**): पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर.
- **नाशिक/खान्देश** (574426 **चौ.किमी**): नाशिक, अहमदनगर, धुळे, जळगाव, नंदुरबार.
- **औरंगाबाद/मराठवाडा** (64822 **चौ.किमी**): औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, हिंगोली, उस्माना लातूर, नांदेड.
- **अमरावती/प.विदर्भ** (46090 **चौ.किमी**): अमरावती, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, वाशिम.
- **नागपूर/पूर्व.विदर्भ** (51336 **चौ.किमी**): नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया.

## नैसर्गिक सीमा :

- **वायव्येस** : सातमाळा डोंगररांगा, गाळणा टेकड्या व सातपुडा पर्वतातील अक्राणी टेकड्या.
- **उत्तरेस** : सातपुडा पर्वतरांगा व त्याचा पूर्वेस गाविलगड टेकड्या.
- **ईशान्येस** : दरेकासा टेकड्या.
- **पूर्वेस** : चिरोळी टेकड्या व भामरागड डोंगर.
- **दक्षिणेस** : हिरण्यकेशी नदी व कोकणातील तेरेखोल नदी.
- **पश्चिमेस** : अरबी समुद्र.

## राजकीय सीमा व सरहद्द :

- **वायव्येस** : गुजरात व दादरा नगर हवेली.
- **उत्तरेस** : मध्यप्रदेश.
- **पूर्वेस** : छत्तीसगड.
- **आग्नेयेस** : आंध्र प्रदेश.
- दक्षिणेस : कर्नाटक व गोवा.

## राज्य व त्यांना जोडणारे महाराष्ट्रातील जिल्हे :

- **गुजरात** : पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे
- **दादर नगर हवेली** : ठाणे, नाशिक
- **मध्ये प्रदेश** : नंदुरबार, धुले, जळगाव, बुलढाणा, अमरावती, नागपुर, भंडारा, गोंदिया
- **छतीसगड** : गोंदिया, गडचिरोली
- **आंधप्रदेश** : गडचिरोली, चंद्रपुर, यवतमाळ, नांदेड
- **गोवा** : सिंधुदुर्ग

## जिल्हे निर्मिती :

- औरंगाबाद जिल्ह्यातून जालना जिल्हा वेगळा केला : **१ मे १९८१**
- उस्मानाबाद मधून लातूर वेगळा केला : **१६ ऑगस्ट १९८२**
- चंद्रपूर मधून गडचिरोली वेगळा केला : **२६ ऑगस्ट १९८२**
- बृहमुंबई जिल्ह्यातून मुंबई उपनगर जिल्हा वेगळा केला : **४ ऑक्टोंबर १९९०**
- अकोला जिल्ह्यातून वाशीम वेगळा केला : **१ जुलै १९९८**
- धुळे जिल्ह्यातुन नंदुरबार वेगळा केला : **१ जुलै १९९८**
- परभणी जिल्ह्यातून हिंगोलीची निर्मिती केली : **१ मे १९९९**
- भंडारा जिल्ह्यातून गोंदियाची निर्मिती केली : **१ मे १९९९**
- परभणी जिल्ह्यातून हिंगोली निर्माण केला : **१ मे १९९९**
- ठाणे जिल्ह्यातून पालघर ची निर्मिती झाली : **१ ऑगस्ट २०१४**

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वैशिष्टये

- कृषिप्रधान अर्थव्यवस्था
- औद्योगीक क्षेत्राची प्रगती
- सेवा क्षेत्राचा विस्तार
- दरडोई उत्पन्नात वाढ
- वाढती लोकसंख्या
- वाढते शहरीकरण
- नैसर्गीक संसाधनांची उपलब्धता
- सहकार क्षेत्रात अग्रेसर
- भांडवल निर्मितीचा अल्प दर
- वाढती बेकारी व दारीद्रय
- मानव विकास निर्देशांक
- उच्च शैक्षणिक परंपरा
- सार्वजनिक आरोग्य सेवेत वाढ

# महाराष्ट्राची लोकसंख्या

1) **आकारमान व वृध्दी दर :-** जनगणना 2011 नुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 11.24 कोटी असून, ती भारताच्या एकुण लोसंख्येच्या ( 121.02) 9.3 टक्के आहे. 2001 ते 2011 या दशकातील लोकसंख्येची वाढ 16 टक्के आहे. 1991 ते 2001 या दशकातील वाढ 22.7 टक्के होती .

2) **लोकसंख्येची घनता :-** जनगणना 2011 नुसार महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता 365 ( भारत 382 ) आहे. सर्वाधी ठाणे जिल्हयात 1157 तर सर्वात कमी गडचिरोलीत 74 आहे.

3) **लिंग गुणोत्तर प्रमाण :-** जनगणना 2011 नुसार महाराष्ट्रातील स्त्री- पुरुष प्रमाण 925 ( भारत 940)आहे. भारतामध्ये 22 व्या स्थानावर

4) साक्षरता प्रमाण :- जनगणना 2011 नुसार महाराष्ट्रातील साक्षता प्रमाण 82.9 ( भारत 74.0) टक्के आहे. भारतात 12 वे स्थान आहे . पुरुष साक्षता 89.8 टक्के तर स्त्रीयांची साक्षता 75.5 टक्के आहेत.

# महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीची कारणे

| अ) जन्मदर जास्त असणे | ब) मृत्यूदरकमी असणे |
|---|---|
| v अल्प वयात विवाह | 1) शिक्षणाचा प्रसार |
| v दारिद्रयाचे प्रमाण | 2) साथींच्या रोगांचे उच्चाटन |
| v संयुक्त कुटुंब पध्दती | 3) दुष्काळी परिस्थीतीवर मात |
| v निरक्षरतेचे प्रमाण | 4) शुध्द पाणी व पुरेसा सकस आहार |
| v संतती नियमनाबाबत अज्ञान | 5) वैधकीय ज्ञानात व सोयीत वाढ |
| v विवाहाची सार्वत्रिकता | 6) कुटुंब कल्याण कार्यक्रम |
| v सामाजिक रुढी व परंपरा | 7) पुरांपासून संरक्षण |

# महाराष्ट्रातील दारिद्रय

| कारणे | उपाययोजना |
|---|---|
| 1) लोकसंख्या बेसूमार वाढ | 1) लोकसंख्या नियंत्रण |
| 2) मागासलेली शेती | 2) अर्थीक विकासाचा वेग वाढविणे |
| 3) लघु व कुटीर उद्योगाचा ऱ्हास | 3) शेती पूरक उद्योगांचा विकास |
| 4) बेकारी व अर्धबेकारी | 4) रोजगार निर्मितीचे कार्यक्रम |
| 5) शिक्षणाचा अभाव | 5) शेती व उद्योगाचा विकास |
| 6) औद्योगिकरणाची मंद गती | 6) शिक्षण व्यवस्थेत बदल |
| 7) रुढी व परंपरा | |
| 8) शारिरिक कामाविषयी अनास्था | |
| 9) जागतीक मंदी | |

# दारिद्रयाचे प्रकार

## १.४ दारिद्र्याचे प्रकार

दारिद्र्य मुख्यतः दोन प्रकारचे – सापेक्ष व निरपेक्ष – असते.

### अ. निरपेक्ष दारिद्र्य :

व्यक्तीला आपल्या दैनंदिन जीवनातील गरजा (अन्न, वस्त्र व निवारा) भागविण्याइतपतही उत्पन्न मिळत नाही, त्याला निरपेक्ष दारिद्र्य म्हणतात.

निरपेक्ष दारिद्र्य ठरविताना सर्वसाधारण जीवनाचा स्तर निश्चित केला जातो. किमान गरजाही भागविल्या जात नाहीत, त्या व्यक्तीस निरपेक्षदृष्ट्या दरिद्री म्हटले जाते. त्यासाठी आजच्या किमतीप्रमाणे किमान आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी किती खर्च येईल, ते काढून किमान खर्चाची पातळी असणारी व्यक्ती निरपेक्षदृष्ट्या दरिद्री समजली जाते.

### ब) सापेक्ष दारिद्र्य

मूलभूत गरजांचा व्यापकदृष्टया विचार केल्यास ज्यांना अन्न, वस्त्र व निवारा या गोष्टी जगण्यासाठी पुरेशा परंतु सर्वसाधारण जनतेच्या राहणीमानाशी तुलना करता कमी दर्जाच्या असतात, त्या सर्वांना दरिद्री समजावे. म्हणजेच दारिद्र्य ही सापेक्ष संकल्पना आहे.[१४]

सापेक्ष दारिद्र्य निश्चित करताना विविध उत्पन्न गटातील लोकांची विभागणी केली जाते. उच्च उत्पन्न गटातील लोकांच्या तुलनेत तळातील लोक सापेक्षदृष्ट्या दरिद्री समजले जातात.

# दारीद्र्य वाढीचे कारणे

**१. दांडेकर वि. म. आणि रथ नीलकंठ**

१९७१ मध्ये दांडेकर वि. म. आणि रथ नीलकंठ यांनी भारतातील दारिद्र्याची व्याख्या करताना ग्रामीण भागासाठी २४०० उष्मांक व शहरी भागासाठी २१०० उष्मांक मिळविण्यासाठी उपभोक्त्याचा दरडोई दरमहा खर्च ग्रामीण भागात रूपये १५ तर शहरी भागासाठी रूपये २२.५ असणे आवश्यक आहे, त्यापेक्षा कमी उत्पन्न मिळाल्यास ती व्यक्ती दारिद्र्यात आहे असे समजावे, असे मत व्यक्त केले.[४]

दांडेकर वि. म. आणि रथ नीलकंठ यांनी उष्मांक निकषावर दारिद्र्याचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, दारिद्र्य आणि पोषण या भिन्न कल्पना आहेत. परंतु त्यांच्यात परस्परसंबंध आहे. दांडेकरांच्या मते, दारिद्र्याचे मापन महत्त्वाचे आहे, परंतु पोषणाचे नाही. सर्वसाधारणपणे उत्पन्न वाढते, तसे पोषण स्थिती सुधारते; पण ती सुधारेलच असे सांगता येत नाही. कारण हा प्रश्न कुटुंब व्यवस्थापनाचा व गरजांची प्राथमिकता ठरविण्याचा आहे. काही कुटुंबे पुरेसे उत्पन्न असूनही कुटुंब व्यवस्थापनात चुकीच्या प्राधान्यक्रमामुळे अपुरे पोषित राहू शकतात. त्यांना गरीब म्हणता येणार नाही. याउलट कमी उत्पन्न असणारी काही कुटुंबे व्यवस्थापन व प्राधान्यक्रम या आधारे पूर्ण पोषित असतील, पण त्यांना दारिद्र्यरेषेच्यावर मानता येणार नाही.

२. **डॉ. अर्मत्य सेन** यांच्या मते, एखाद्या व्यक्तीला त्याने जोपासलेल्या मूल्यांप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्र्य होय.

३. **मानवी विकास अहवाल २०१०** नुसार– माणशी दर दिवशी १.२५ डॉलर पेक्षा कमी उत्पन्न मिळविणारी व्यक्ती म्हणजे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होय.[५]

४. **सुरेश तेंडुलकर समिती**

प्रति व्यक्ती दरमहा ग्रामीण भागात रू. ४४६.६८ तर शहरी भागात रू. ५७८.८ किमान जीवनमान जगण्यासाठी आवश्यक आहे. यापेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्ती दारिद्र्यरेषेखालील समजल्या जाव्यात.[६]

# बेरोजगारी

महाराष्ट्रातील बेरोजगारीकडे आपण तपशिलाने पाहू. २०१७-१८ या आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील १५.०९ कोटी स्त्री-पुरुषांना रोजगार होता आणि कमावत्या वयातील ७७.६ लाख स्त्री-पुरुष बेरोजगार होते. अशा प्रकारे, महाराष्ट्रातील एकंदर रोजगारक्षम लोकसंख्या १५.८६ कोटी होती. २०१७-१८ या एका आर्थिक वर्षात १५.८६ पैकी ७७.६ लाख माणसे बेरोजगार, म्हणजे वार्षिक बेरोजगारीचे प्रमाण महाराष्ट्रात सुमारे पाच टक्के झाले. हेच प्रमाण २०११-१२ या आर्थिक वर्षात आपल्या राज्यात १.३ टक्के होते. म्हणजे १.३ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत, अशी मोठी वाढ बेरोजगारीत झाली आहे. महाराष्ट्रातील बेरोजगारीत अवघ्या पाच-सहा वर्षात तिप्पट वाढ झाली. इतकी वाढ (किंवा रोजगारांमध्ये इतकी घसरण) यापूर्वी कधी झालेली नव्हती. त्यातही, शहरी भागांत २०११-१२ या आर्थिक वर्षात २.२ टक्के असे बेरोजगारीचे प्रमाण होते. ते झपाट्याने वाढून २०१७-१८ मध्ये ७.४ टक्के झाले. ग्रामीण भागात २०११-१२ मध्ये ०.७ टक्के या प्रमाणात असलेली बेरोजगारी २०१७-१८ मध्ये ३.३ टक्क्यांवर पोहोचली. म्हणजे रोजगारसंधींमध्ये सुमारे तिप्पट घसरण, हे ग्रामीण व शहरी अशा दोन्ही प्रकारच्या भागांतील चित्र होते.

# बेरोजगारीचा अर्थ व प्रकार

**बेरोजगारीचा अर्थ व प्रकार :**

बेरोजगारी म्हणजे काय? बेरोजगार कोणाला म्हणावे? याबाबत एक वाक्यता आढळून येत नाही. बेरोजगारीबाबत अनेकांनी व्याख्या केल्या आहेत. त्यातील काही व्याख्यावरून बेरोजगारीचा अर्थ आपल्याला कळेल.

१) "प्रचलित वेतनदारावर काम करण्याची इच्छा व पात्रता असलेल्या व्यक्तींना काम न मिळण्याची स्थिती म्हणजे बेरोजगारी होय."

२) प्रा.पिगू मते," रोजगारात नसलेल्या परंतू रोजगार मिळावा अशी इच्छा असलेल्या व्यक्तीला बेकार म्हणता येईल."

भारतात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बेरोजगारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. बेरोजगारी भारतात सार्वत्रिक स्वरूपात आढळते. भारतात ग्रामीण बेरोजगारी व शहरी बेरोजगारी अशी दोन प्रकारची बेरोजगारी दिसून येते. ग्रामीण भागात पूर्ण बेरोजगारी, अर्धबेरोजगारी, हंगामी बेरोजगारी, सुप्त बेरोजगारी व सुशिक्षित बेरोजगारी

# महाराष्ट्रातील बेरोजगारी

| कारणे | उपाययोजन |
| --- | --- |
| लोकसंख्या वाढ | लोकसंख्या नियंत्रण |
| शेतीचे हंगामी स्वरुप | अर्थिक विकासाचा वेग वाढविणे |
| जमीनीचे विभाजन | शेती पुरक उद्योगांचा विकास |
| मंद अर्थिक विकास | रोजगार निर्मितीचे कार्यक्रम |
| दारिद्रय | शेती व उद्योगाचा विकास |
| यांत्रिकरणावर भर | शिक्षण व्यवस्थेत बदल |
| दोषपूर्ण शिक्षण व्यवस्था | |
| सरकारी धोरण | |

# महाराष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाणे टक्केवारी

महाराष्ट्राच्या दारिद्र्याच्या प्रमाणाबाबत १९७३–७४ पासून २००६–०७ पर्यंत ग्रामीण व शहरी दारिद्र्यात कसा बदल होत गेला हे तक्ता क्र. १.६ वरून स्पष्ट होते.

तक्ता १.६

महाराष्ट्रातील दारिद्र्याचे प्रमाण (टक्केवारीमध्ये)

| अ. क्र. | वर्ष | महाराष्ट्र | | | भारत |
|---|---|---|---|---|---|
| | | ग्रामीण | शहरी | एकूण | |
| १. | १९७३–७४ | ५७.७१ | ४३.८७ | ५३.२४ | ५४.९३ |
| २. | १९७७–७८ | ६२.९७ | ४०.०९ | ५५.८८ | ५१.३० |
| ३. | १९८३–८४ | ४५.२३ | ४०.२६ | ४३.४४ | ४४.५० |
| ४. | १९८७–८८ | ४०.७८ | ३९.७८ | ४०.४१ | ३८.९० |
| ५. | १९९९३–९४ | ३७.९३ | ३५.१५ | ३६.८६ | ३६.०० |
| ६. | १९९९–२००० | २३.७२ | २६.८१ | २५.०२ | २६.१० |
| ७. | २००४–०५ | २९.६ | ३२.२ | ३०.७ | २७.५ |
| ८. | २००६–०७ | १७.०० | १५.२० | १६.१० | १९.३० |

# Thank You